महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ❖ ०२ एप्रिल २०२५ ❖वर्ष ६ ❖अंक २७४ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# खर्डीचे उपजिल्हा रुग्णालय अडकलंय लालफितीत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

खर्डी : खर्डीतील दिवसेंदिवस वाढणारी रुग्णसंख्या लक्षात घेऊन रुग्णालयासाठी नवीन अद्यावत व प्रशस्त एक मजली इमारत नुकतीच बांधण्यात आली आहे. येथील गावपाडे,मुंबई-आग्रा महामार्ग व मध्य रेल्वे येथे होणाऱ्यां अपघात ग्रस्तांना तात्काळ आरोग्य सुविधा मिळून त्यांचे जीव वाचावे हा उद्देश ठेऊन राज्य सरकारने 1 जुलै2024 रोजी येथील ग्रामीण रुग्णालयाला 50 खाटांच्या ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयाची मंजुरी दिली आहे.परंतु येथील 30 खाटांचे ग्रामीण रुग्णालयाचे 50 खाटांच्या उपजिल्हा रुग्णालय सुरू करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहवालाची गरज आहे.याबाबत खर्डी ग्रामीण रुग्णालयाने सार्वजनिक बांधकाम विभागाशी पत्रव्यवहार करून 6 महिने उलटले तरी संबंधित अधिकारी येथील रुग्णालयाची पाहणी करून अहवाल देण्यास चालढकल करत असल्याने येथे 50 खाटांचे उपजिल्हा रुग्णालयातील मंजूर कर्मचारी उपलब्ध करून घेण्यासाठी अडचण येत असून सद्यस्थितीत हे रुग्णालय 17 कर्मचाऱ्यांवर सुरू असल्याने कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येत असल्याने येथील गंभीर रुग्णांवर अत्याधुनिक उपचार करण्यास अडचण येत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक करीत आहेत.

खर्डी येथील रुग्णालयाच्या इमारतीचे काम राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य विभागाकडून करण्यात आले असून सदर इमारतीचा ताबा अजून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित केले नसल्याने सदर इमारतीत 50 खाटांचे अंदाजपत्रक व आराखडा बनवुन देणे शक्य नसल्याचे शहापूरचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता यांनी पत्राद्वारे कळवले आहे.

खर्डी गावातून मुंबई-आग्रा महामार्ग, समृद्धी महामार्ग, मध्य रेल्वे,सर्व शासकीय कार्यालये,30 गावे व 100 च्यावर आदिवासी पाडे असल्याने येथील रहिवाश्याना खर्डीचे रुग्णालय मध्यवर्ती ठिकाणी असल्याने येथे रोज 250 च्या आसपास रुग्णांची रोज तपासणी होत असते.परंतु कर्मचारी कमी असल्याने येथील कर्मचाऱ्यांना 24 तास काम करावे लागत असल्याने कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण दिवसेंदिवस वाढत आहे. खर्डी नाक्यावर ग्रामीण रुग्णालयाच्या नविन बांधलेल्या इमारतीत उपलब्ध असलेल्या 30 खाटा व कर्मचारी यांच्या सह उपजिल्हा रुग्णालय सुरू करण्यात आले आहे.परंतु 50 खाटांच्या रुग्णालयासाठी 48 कर्मचाऱ्यांची मंजुरी असूनही इथं फक्त 17 कर्मचाऱ्यांवर हे रुग्णालय सुरू असल्याने रुग्णांना अत्याधुनिक साहित्य उपलब्ध असूनही मंजूर तज्ञ डॉक्टर व कर्मचारी उपलब्ध होत नसल्याने हे रुग्णालय कागदावरच सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे. स्ट्रकचर,फायर व इलेक्ट्रॉनिक ऑडिट ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून न झाल्याने अडचणींचा डोंगर उभा आहे.

"राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य सेवा व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे इमारतीची तांत्रिक अडचण सोडवण्यासाठी पाठपुरावा सुरू असून वरिष्ठांकडे मंजूर कर्मचारी उपलब्ध करण्याची मागणी केली आहे.-आशिलाक शिंदे, वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय खर्डी.

# मंत्री मंडळ बैठकीत मुरबाड तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी आर्थिक तरतूद

## आ. किसन कथोरेंच्या मागणीला यश



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.

### मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेले निर्णय

१. मार्वल-महाराष्ट्र रिसर्च अँण्ड व्हिजीलन्स फॉर एनहान्स्ड लॉ एन्फोसमेंट लि. शक्ति प्रदत्त समितीच्या अधिपत्याखाली येणार आहे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता वापराची कामे प्राथम्याने देणार. (गृह विभाग)

२. गडचिरोली जिल्ह्यातील प्रमुख खनिज व विशिष्ट औद्योगिक गौण खनिजाच्या व्यवस्थापनासाठी गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण स्थापन करणार, यासाठीच्या प्रारूप अधिनियमास मान्यता देण्यात आली आहे. (उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग)

३. नोंदणीकृत वाहन निष्कासन केंद्रामध्ये स्वेच्छेने निष्कासित केलेल्या वाहनांच्या अनुषंगाने सुधारित कर सवलत लागू करण्याचा निर्णय. (गृह विभाग-परिवहन)

४. बाईक टॅक्सी वाहनांचे समुच्चयक धोरण 1 लाख लोकसंख्या असलेल्या सर्व शहरात रमानाथ झा समिती शिफारशी सुधारणेसह लागू करणार (गृह विभाग-परिवहन) ५. नागन मध्यम प्रकल्प, जिल्हा नंदूरबार प्रकल्पासाठी 161.12 कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा विभाग)

६. सिंदफणा नदीवरील निमगाव ता. शिरूर जिल्हा बीड कोल्हापूरी पद्धती बंधारा याचा विस्तार आणि सुधारणेअंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी 22.08 कोटी रुपयांना प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा विभाग) Washim News: शेतकऱ्यांचे अवयव विकत घ्या! गळयात बॅनर, त्यावर अवयवांच्या किमती: पिककर्जाला कंटाळलेल्या शेतकऱ्याची व्यथा

७. सिंदफणा नदीवरील ब्रम्हनाथ येळंब ता. शिरूर जिल्हा बीड कोल्हापुरी पद्धती बंधारा याचा विस्तार आणि सुधारणेअंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी 17.30 कोटी रुपयांना प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा विभाग)

८. सिंदफणा नदीवरील टाकळगाव (हिंगणी) ता. गेवराई जिल्हा बीड कोल्हापुरी पद्धती बंधारा याचा विस्तार आणि सुधारणेअंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी 19.66 कोटी रुपयांना प्रशासकीय मान्यता. (जलसंपदा विभाग)

९. वडसा-देसाईगंज-गडचिरोली या रेल्वे मार्गासाठी 1 हजार 886 कोटी ५ लाख कोटी रुपयांच्या सुधारित खर्चास मान्यता, यातील 943.025 कोटी इतकी 50% रक्कम राज्य सरकार देणार (गृह विभाग/परिवहन)

१०. पुणे-शिरूर-अहिल्यानगर मार्गे छत्रपती संभाजीनगर या राष्ट्रीय महामार्गाची सुधारणा आणि काम पूर्ण झाल्यावर केंद्रीय भुपृष्ठ वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या 2008 पथकर धोरणानुसार सर्व प्रकारच्या वाहनांवर पथकर. (सार्वजनिक बांधकाम विभाग)

११. अजनी, नागपूर येथील देवनगर को-ऑप. हाऊसिंग सोसायटी च्या जागेवरील क्रीडांगणांचे आरक्षण रहिवासी करण्याचा निर्णय. (नगरविकास विभाग)

१२. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यातील ५०० शेतकऱ्यांना धानासाठी पणन हंगाम २०२०-२१ करिता प्रोत्साहनपर ७९ लाख ७१ हजार २९२ रुपयांचे अनुदान मंजूर (अन्न व नागरी पुरवठा)

# भुयारी गटार योजनेसाठी उल्हासनगर महापालिकेला १०० कोटींचे कर्ज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : शहरात ४२३ कोटीची भुयारी गटार योजनेचे काम पूर्ण होण्यासाठी राष्ट्रीय गृहनिर्माण बँके अंतर्गत नागरी पायाभूत सुविधा विकास फुटबॉल निधी म्हणून १०० कोटीच्या कर्जाला मंजुरी देण्यात आली. डेली शेअर त्यातील १८.७६ कोटींचा पहिला हप्ता मिळणार असल्याची माहिती मुख्य लेखा अधिकारी किरण भिल्लारे यांनी दिली असून पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक घुले यांनी याला दुजोरा दिला आहे.उल्हासनगरात अमृत योजने अंतर्गत ४२३ कोटीची भुयारी गटार योजनेचे काम गेल्या दोन वर्षापासून सुरु आहे. या योजने अंतर्गत गटारीचे पाईप नव्याने टाकण्यात येत असून मलनिः सरण केंद्र उभारण्यात येत आहे. गटारीचे पाईप टाकण्यासाठी खोदलेले रस्ते जैसे थे दुरस्ती करावयाचे आहे. या योजने मध्ये केंद्र, राज्य व महापालिका यांचा प्रत्येकी ३३ टक्के निधीचा समावेश आहे. आजपर्यंत योजनेचे ३० टक्के काम पूर्ण झाले असून ठेकेदाराला कामापोटी ९५ कोटी पेक्षा जास्त बिल अदा केले. असी माहिती पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक घुले यांनी दिली. महापालिकेची आर्थिकस्थिती डबघाईला आली असल्याने, योजनेतील स्वतःचा हिस्सा देण्यासाठी पैसा नाही. भुयारी गटार योजना वेळेत पूर्ण होण्यासाठी महापालिकेने १०० कोटीच्या कर्जाची मागणी एनएचबी (राष्ट्रीय गृहनिर्माण बँक) यांच्याकडे केली होती. नागरी पायाभूत सुविधा विकास निधी (युआयडीसी) अंतर्गत १०० कोटींचे कर्ज मंजूर झाले. तसेच १८.७६ कोटींचा पहिला हप्ता लवकरकच मिळणार असल्याचे मुख्य लेखअधिकारी किरण भिल्लारे यांनी दिली. पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक घुले यांनी १०० कोटीचे कर्ज मंजूर झाल्याच्या वृताला कबुली दिली. तसेच ७ वर्षात कर्जाची परतफेड करावी लागणार असून व्याजदर कमी असल्याचे भिल्लारे यांचे म्हणणे आहे. योजनेचे ३० टक्के काम पूर्ण झाले असून १०० टक्के काम कधी पूर्ण होणार? असा प्रश्न सर्वस्तरातून विचारला जात आहे. गटारीचा पहिला टप्पा पूर्ण भुयारी गटार योजनेचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून या योजनेतून मुख्य मलनिःसारन वाहिण्या नव्याने टाकण्यात आले असून दोन मलनिः सारन केंद्राचे काम पूर्ण झाले. तार दुसऱ्या टप्यात शहर अंतर्गत गटारीचे पाईप टाकण्याचे काम सुरु आहे.

# उन्हाच्या तडाख्यामुळे जिल्हा परिषद शाळांच्या वेळेत बदल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : उन्हाच्या तडाख्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा गंभीर परिणाम लक्षात घेता ठाणे जिल्हा परिषद शाळांच्या वेळेत महत्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. आज, १ एप्रिलपासून जिल्ह्यातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळेची वेळ सकाळच्या सत्रात प्राथमिक शाळांसाठी सकाळी ०७.०० ते ११.१५ वेळापत्रक तयार करण्यात आल्याबाबतची माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी दिली तर माध्यमिक शाळांसाठी ०७.०० ते ११.४५ वेळापत्रक तयार करण्यात आल्याबाबतची माहिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) ललिता दहितुले यांनी दिली आहे.




### विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी ?

१. उन्हाळ्यात विद्यार्थ्यांनी मैदानी/शारीरिक हालचाली टाळाव्यात. बाहेर मैदानात वर्ग घेऊ नयेत.

२. विद्यार्थ्यांना उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी शिक्षित करावे.

३. वर्गामध्ये पंखे सुस्थितीत असल्याची खात्री करणे.

४. विद्यार्थ्यांना थंड पाणी उपलब्ध करुन द्यावे.

५. टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी, कोशिंबिर तसेच स्थानिक उपलब्ध फळे आणि भाज्या यासारखी उच्च पाणी सामग्री असलेली हंगामी फळे आणि भाज्या खाणे.

६. पातळ, सैल, सुती आणि शक्यतो हलक्या रंगाचे कपडे घालावे.

७. डोके झाकून ठेवण्यासाठी छत्री, टोपी, टॉवेल आणि इतर पारंपारिक साधनांचा वापर करणे.

८. उन्हात बाहेर जाताना शूज किवा चप्पल घालणे.

९. उन्हात बाहेर पडणे टाळणे.

राज्यामध्ये वाढलेल्या उन्हाच्या कडाक्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम टाळण्यासाठी जिल्हा परिषद शाळाचे वेळ बदल करण्यात आले असून शिक्षक व पालकांनी तसेच विद्यार्थ्यांनी काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत करण्यात येत आहे.

# शहापूर - सापगाव रस्त्याने मोडले जनतेचे कंबरडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : शहापूर ते खोपोली राष्ट्रीय महामार्गाचे भूमिपूजन ७ जानेवारी २०१८ ला करण्यात आले होते.तब्बल ७ वर्षे उलटूनही ठेकेदाराच्या अनागोंदी कारभारामुळे आणि प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे सात वर्षानंतरही महामार्गाचे काम पूर्णत्वास येत नाही. त्यामुळे ठेकेदाराने विनाकारण खोदून ठेवलेल्या रस्त्यावर धुळीचे साम्राज्य वाढले असून प्रवाशांना अंगावर मातीचे लोट घेऊनच प्रवास करावा लागत आहे.पर्यायाने या रस्त्याने प्रवास करणारे वाहनचालक,आबाल -वृद्ध,शालेय विद्यार्थी,महिला वर्ग मागील सात वर्षांपासून त्रस्त आहेत.किंबहुना प्रवाशांची वाहने नादुरुस्त झाली असून रस्त्यावर धुळीचे साम्राज्य पसरले आहे. तर जीवघेण्या खड्डयामुळे वाहन चालकांचे कंबर्डे मोडले आहे. तर धुलीमुळे प्रवाशी श्वसनाच्या आजाराने ग्रस्त झाले आहेत.



शहापूर-मुरबाड-म्हसा- पारगाव-कर्जत रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण करण्याचे काम पी.एस.के.इन्फ्रा आणि प्रा.लिमिटेड कंपनी २०१८ पासुन करत असुन मागील ७ वर्षांपासुन या रस्त्याचे दुकान मांडुन ठेवल्याने या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना असाह्य वेदनांचा सामना करावा लागत आहे.याविरोधात प्रसारमाध्यमांनी अनेक वेळा आवाज उठवला.परंतु संबंधित यंत्रणेला पाझर फुटू शकला नाही. विशेषत: स्थानिक आमदार आणि खासदार यांनी जातीने लक्ष देऊन ही अनेक वर्षांची समस्या संपूष्टात आणायला हवी होती. तालुक्यातील किन्हवली, डोळखांब,कोठेरे,साकडबाव, टाकीपठार,टेंभरे, ठिले, आल्याणी, गेगाव, नांदवल, खरीड ,नांदगाव, नेहारोली, लेनाड आदि भागातून तालुक्यातील लोकसंखेच्या ७० टक्के नागरिक सापगांव - शहापूर रस्त्यावरून प्रवास करतात.

@ वनविभागाचा हिरवा कंदील ; तरीही प्रवाशी लालेलाल@

जमेची बाजू म्हणजे या महामार्गावरील शहापूर ते पाटगावपर्यंत वनविभागाच्या सर्व परवानग्या मिळाल्याने वनविभागाच्या कार्यक्षेत्रात या महामार्गाचे काम सुरु आहे. या महामार्गामध्ये अनेक शेतकऱ्यांचे भूसंपादन करणे गरजेचे आहे.चार वर्ष उलटून देखिल शेतकऱ्यांना केवळ भूसंपादनाच्या नोटिसीशिवाय दुसरी कुठलीही कारवाई होत नसल्याने भूसंपादनाचा मोबदला ही शेताकऱ्यांना दिला जात नाही.तथापी या महामार्गाला वनविभागाचा हिरवा कंदील मिळाला असला तरी धुळीच्या साम्राज्याने या रस्त्यावरून प्रवास करतांना प्रवाशी लालेलाल होतांना दिसत आहेत.

**या रस्त्यावरून प्रवास करतांना मागील सात वर्षांपासून आम्ही यातना भोगतोय.या नादुरुस्त रस्त्यामुळे जनतेच्या वाहनांची वाट तर लागली आहेच,शिवाय बहुतांश वाहन चालकांना कमरेचा त्रासही जाणवत आहे.याबाबत मी स्वतः आमदार दौंलत दरोडा यांना प्रत्यक्ष जाब विचारला होता.मात्र त्यांच्याकडून अभ्यासपूर्वक उत्तर मिळाले नाही. येत्या दोन दिवसात खासदार सुरेश (बाळ्यामामा) म्हात्रे यांची भेट घेऊन प्रवाशांना जाण्या-येण्या योग्य रस्ता बनवण्यासंदर्भात प्रशासनाला सूचना करण्याची मागणी करणार आहे.**
**- राजकुमार लहू बसवंत, खुटघर, स्थानिक नागरिक.**




# उद्योजक राजेश पाटील यांचे चिरंजीव रूपेरी पडद्यावर झळकणार

## 'वारी' चित्रपटाच्या चित्रीकरणाचा आ.किसन कथोरेंच्या हस्ते शुभारंभ



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : महाराष्ट्रातील शेकडो वर्षाची संताची परंपरा असलेल्या पंढरपुरच्या पायी वारी सोहळयाचे वेड आजही वारकरी ,टाळकरीसह सगळयांनाच आहे.विठ्ठलाच्या भक्तीत,नामसंकीर्तनात वारकरी तल्लीन होऊन न चुकता दरवर्षी आषाढी -कार्तिकी एकादशीला पंढरपूर ,आळंदीची वारी करत असतात. म्हणून वारीचा हा महिमा अगाध आहे.

या वारी सोहळ्याचे अनुपम वर्णन अनेक चित्रपटाच्या माध्यमातून यापुर्वी दाखविण्यात आले आहे. परंतु असेच एक पंढरीच्या पांडुरंगाचे परम भक्त असलेले अंबरनाथ येथिल प्रसिद्ध उदोजक राजेश सावळाराम पाटील यांनी या" वारी " सोहळयावर चित्रपट काढण्याचा संकल्प केला असून या चित्रपटाचे स्वतः निर्माते असणार आहेत.

या चित्रपटाचे मुहूर्त आज मुरबाड विधासभेचे आमदार किसन कथोरे व कल्याण पुर्वच्या आमदार सुलभताई गायकवाड यांच्या हस्ते मांगरूळ अंबरनाथ येथे करण्यात आले.यावेळी प्रसिद्ध मराठी सिने अभिनेता प्रसाद ओक, वैभव मांगले, दिग्दर्शक नितीन कांबळे यांच्यासह मराठी चित्रपट सृष्टीतील अनेक कलाकार उपस्थित होते.या चित्रपटात मुख्य भुमिका राजेश पाटील यांचे चिरंजीव जय पाटील साकारणार असून मुख्य अभिनेत्रीची भुमिका निशिगंधा वाड यांची मुलगी ईश्वरी वाड साकारणार आहे.

यावेळी आमदार किसन कथोरे यांनी राजेश पाटील यांनी एक चांगला निर्णय घेतला असून चित्रपट सृष्टीत पदार्पण केल्याबद्दल त्यांचे कौतुक करत जय पाटीलसह सर्व नवोदित कलाकारांना शुभेच्छा दिल्या. राजेश पाटील हे आषाढी वारीला दरवर्षी एक महिना आवर्जुन जातात.वारीचे वेड त्यांना आहे आणि आज त्यांच्या हातून एका भक्तीमय मराठी चित्रपटाची निर्मिती होते ही एक अभिमानास्पद बाब असून महाराष्ट्रात नक्कीच हा चित्रपट सर्व वारकरी , विठ्ठल भक्तांना, महाराष्ट्रातील जनतेला आवडेल अशी अपेक्षा यावेळी आमदार कथोरे यांनी व्यक्त करून चित्रपटाला भरपूर शुभेच्छा दिल्या.

मी गेली पंधरा वर्ष पंढरपूरची पायी वारी करत असतो. पंढरीच्या पांडुरंगाचा मी निस्सिम भक्त आहे. माझ्या हातून एक चांगले काम घडेल तसेच माझ्या मुलालाही चित्रपट क्षेत्रात एक नविन संधी निर्माण व्हावी या दृष्टीने मी हा चित्रपट हाती घेतला असून नक्कीच महाराष्ट्रातील वारकर्यांना तसेच जनतेला तो आवडेल अशी मला खात्री आहे.येत्या वर्ष भरात या चित्रपटाचे शुटींग पुर्ण होऊन लोकांना पाहायला मिळेल.
- राजेश सावळाराम पाटील, निर्माता वारी चित्रपट

# आता बारावीपर्यंत मराठी विषय सक्तीचा !



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : महाराष्ट्र सरकारने बारावीपर्यंत मराठी विषय सक्तीचा करण्याचा आदेश जारी केला आहे. याअंतर्गत, कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाने येत्या २०२५-२६ सत्रापासून या आदेशाची अंमलबजावणी करण्याची मागणी करणारे निवेदन पाठवले.

## राज्य सरकारचा निर्णय

मिळालेल्या माहितीनुसार देशात हिंदी भाषेवरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, राज्यातील महायुती सरकारने महाराष्ट्रातील मराठी भाषेबाबत मोठा निर्णय घेतला आहे. याअंतर्गत, कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाच्या वतीने निवासी जिल्हा दंडाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री आणि शालेय शिक्षणमंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले, ज्यामध्ये आगामी सत्र २०२५-२६ पासून या आदेशाची अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली. त्यात म्हटले आहे की, अनेक वर्षांच्या मागणीनंतर, सरकारने बारावीपर्यंत सर्व विद्याशाखांच्या विद्यार्थ्यांसाठी मराठी विषय सक्तीचा केला आहे. यामुळे मराठी विषयाच्या शिक्षकांमध्ये उत्साह निर्माण झाला आहे.

# गीतासार



## अध्याय ६ आत्मसंयमयोगः

तं विद्याद् दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम् । स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा ॥ ६-२३ ॥

जो दुःखरूप संसाराच्या संयोगाने रहित आहे, तसेच ज्याचे नाव योग आहे, तो जाणला पाहिजे. तो योग न कंटाळता अर्थात धैर्य व उत्साह यांनी युक्त चित्ताने निश्चयाने केला पाहिजे. ॥ ६-२३ ॥

सङ्कल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः । मनसैवेन्द्रियग्रामं विनियम्य समन्ततः ॥ ६-२४ ॥

संकल्पाने उत्पन्न होणाऱ्या सर्व कामना पूर्णपणे टाकून आणि मनानेच इंद्रियसमुदायाला सर्व बाजूंनी पूर्णतया आवरून ॥ ६-२४ ॥

शनैः शनैरुपरमेद्‌बुद्ध्या धृतिगृहीतया । आत्मसंस्थं मनःकृत्वा न किञ्चिदपि चिन्तयेत् ॥ ६-२५ ॥

क्रमाक्रमाने अभ्यास करीत उपरत व्हावे; तसेच धैर्ययुक्त बुद्धीने मनाला परमात्म्यात स्थिर करून दुसऱ्या कशाचाही विचारही करू नये. ॥ ६-२५ ॥

यतो यतो निश्चरति मनश्चञ्चलमस्थिरम् । ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥ ६-२६ ॥

हे स्थिर न राहणारे चंचल मन ज्या ज्या शब्दादी विषयांच्या निमित्ताने संसारात भरकटत असते, त्या त्या विषयांपासून त्याला आवरून वारंवार परमात्म्यात स्थिर करावे. ॥ ६-२६ ॥

# नेपाळमध्ये राजेशाहीचे वारे



नेपाळमध्ये पुन्हा राजेशाहीचे वारे नेपाळमधील नागरिक पुन्हा एकदा राजेशाही प्रस्थापित व्हावी यासाठी रस्त्यांवर उतरून आंदोलन करत आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनाला आता हिंसक वळण लागले असून या आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसाचारात दोन जणांचा जीवही गेला आहे. जगातील एकमेव हिंदू राष्ट्र असलेल्या नेपाळमध्ये सर्वाधिक काळ राजेशाही होती. नेपाळमध्ये जवळपास २४० वर्ष राजेशाही होती. १९९६ साली पहिल्यांदा नेपाळमधील डाव्या विचारांच्या माओवाद्यांनी राजेशाही विरुद्ध बंड पुकारले आणि देशात लोकशाही प्रस्थापित व्हावी यासाठी आंदोलन झाले. जगात सर्वत्र लोकशाहीचे वारे असताना नेपाळमध्ये लोकशाहीच असावी अशा विचाराने तरुणांनी देखील माओवाद्यांच्या या आंदोलनाला पाठिंबा दिला मात्र नेपाळमध्ये राजेशाहीची पाळेमुळे खोलवर रुतली असल्याने या आंदोलनाला लगेच यश मिळाले नाही. २००१ साली नेपाळमध्ये अशी घटना घडली ज्यामुळे राजेशाहीची पाळेमुळेच ध्वस्त झाली. २००१ मध्ये तत्कालीन राजमहालामध्ये नेपाळचे तत्कालीन राजे वीरेंद्र वीर विक्रम शहा आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबाची हत्या झाली. या हत्याकांडाने केवळ नेपाळच नाही तर संपूर्ण जग हादरून गेले. या हत्याकांडानंतर ज्ञानेंद्र शहा यांना नवे राजे म्हणून घोषित करण्यात आले. या हत्याकांडानंतर राजेशाही विरुद्ध लोकांच्या मनात चीड निर्माण झाली होती त्यातच २००५ मध्ये राजे ज्ञानेंद्र यांनी नेपाळची घटना रद्द करून टाकली आणि संसद ही बरखास्त केली त्यामुळे माओवादी आणखी चिडले व त्यांनी उग्र आंदोलने केली त्यांच्या या आंदोलनात लोकशाहीवादीही होते. माओवादी आणि लोकशाही वाद्यांनी राजेशाही विरुद्ध थेट यलगार पुकारला त्यामुळे २००८ साली २४० वर्षाची राजेशाही उखडून पडली आणि लोकशाही प्रस्थापित झाली. या आंदोलनात जवळपास १६ हजार नागरिकांचा जीव गेला. २००८ साली राजेशाही जाऊन लोकशाही प्रस्थापित झाल्यावर तेथील नागरिकांना वाटले की लोकशाही मार्गाने आता आपला देश प्रगती करेल. शेजारील भारताने जशी लोकशाही मार्गाने प्रगती केली तशीच प्रगती आपला देशही करेल पण नागरिकांची ही अपेक्षा फोल ठरली. कारण नेपाळमध्ये लोकशाही प्रस्थापित होऊन देखील नेपाळला स्थिर सरकार मिळू शकले नाही. २००८ ते आतापर्यंत म्हणजे सतरा वर्षात नेपाळमध्ये १४ सरकारे आली. त्यात पुष्लकमल दहल यांचे सरकार तीन वेळा तर के पी ओली शर्मा यांचे चार वेळा सरकार आले पण एकानेही स्थिर सरकार दिले नाही. या सरकारांच्या काळात नेपाळमध्ये भ्रष्टाचार प्रचंड वाढला. छोट्या छोट्या कामांसाठी नागरिकांना पैसे मोजावे लागत. भ्रष्टाचारामुळे या सरकार विरुद्ध जनतेत प्रचंड नाराजी निर्माण झाली हीच नाराजी हेरून राजे ज्ञानेंद्र यांनी फेब्रुवारी मध्ये एक निवेदन जरी केले या निवेदनात त्यांनी म्हटले की राष्ट्र आणि राष्ट्राचे ऐक्य वाचवण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची वेळ आली आहे. राजे ज्ञानेंद यांच्या या निवेदनानंतर नेपाळमध्ये पुन्हा राजेशाही प्रस्थापित व्हावी असे वाटणारा वर्ग रस्त्यावर आला आणि त्यांनी पुन्हा राजेशाही प्रस्थापित व्हावी यासाठी आंदोलन केले. राजेशाही समर्थकांचे हे आंदोलन कुचलून टाकण्यासाठी तेथील सरकार सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. या आंदोलनांमुळे नेपाळमध्ये लगेच राजेशाही प्रस्थापित होईल असे नाही मात्र राजेशाही प्रस्थापित व्हावी असे वाटणारा जो वर्ग आहे त्यांना आशेचा किरण दिसला आहे. तो वर्ग यापुढे ही राजेशाही साठी रस्त्यावर उतरेल. नेपाळमध्ये राजेशाहीचे वारे पुन्हा वाहू लागले आहे हे नक्की.

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# शैक्षणिक व्हिडिओ स्पर्धेत अनिल डगळे सन्मानित




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे :आजच्या आधुनिक काळामध्ये ऑनलाईन शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शैक्षणिक तंत्रज्ञानाद्वारे शिक्षक, शिक्षक प्रशिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची देवाण-घेवाण आणि क्षमता निर्माण करण्याच्या दिशेने एक पाऊल म्हणून माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा सध्या मोठ्या प्रमाणावर वापर होताना दिसत आहे. यामुळे डिजिटल शिक्षणाचे वेगळे महत्त्व निर्माण झालेले आहे. कोविड-19 काळात प्रत्यक्ष शाळा बंद असताना ऑनलाईन शिक्षणाच्या विविध माध्यमातून अध्ययन - अध्यापन प्रणाली घडताना दिसून येत होती. शिक्षक आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपले अध्यापन अधिक रंजक आणि दर्जेदार करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत तसेच विद्यार्थी याच डिजिटल साधनांचा वापर करून आपले अध्यापन सुकर करत आहेत. यासाठीच शालेय शिक्षण व क्रीडा विभाग राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत शिक्षकांमध्ये निकोपस्पर्धा निर्माण होऊन ही साहित्य निर्मितीची चळवळ उभी राहावी यासाठी राज्यातील सर्व माध्यमाच्या सर्व व्यवस्थापनाच्या प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षक प्रशिक्षक स्तरावरील शिक्षक मुख्याध्यापक व शिक्षक प्रशिक्षण यांच्यासाठी राज्यस्तर दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदरच्या चळवळीच्या माध्यमातून संकलित करण्यात येणारे साहित्य हे राज्यातील सर्व शिक्षक विद्यार्थी यांच्यासाठी संदर्भीय तसेच अध्ययन पूरक ठरणार आहेत.

राज्य शैक्षणीक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे महाराष्ट्र राज्य यांचे मार्फत आयोजित केलेल्या शिक्षकांसाठी दर्जेदार व्हिडिओ निर्मिती स्पर्धा 2023 मध्ये तालुका स्तरावर इ.3 री ते 5 वी विषय गणित शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती या गटात ठाणे जिल्ह्यातील शिशु विकास मंदिर शाळेतील शिक्षक अनिल नामदेव डगळे सर यांना राज्य शासनाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा 2020 च्या बक्षीस वितरण समारंभामध्ये महानगरपालिका शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांच्या हस्ते देऊन अनिल नामदेव डगळे सर यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी रविंद्र पाटील, प्र अधिक्षक विजय साळवे, गट अधिकारी,बामणे मॅडम, सावंत मॅडम व इतर मान्यवर उपस्थित होते.ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागाच्या वतीने डगळे सरांचे अभिनंदन करून त्यांना पुढील दर्जेदार व्हिडिओ निर्मितीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. हा सन्मान शिक्षण क्षेत्रातील नव्या उपक्रमांना चालना देणारा असून यामुळे मला आणखी प्रेरणा मिळाली आहे असे अनिल डगळे यांनी आपले मत व्यक्त करताना सांगितले.

# क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाची बैठक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघ पुणे संलग्न ठाणे जिल्हा क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाच्या माध्यमातून रविवार 6 एप्रिल रोजी म. हो. विद्यालय, ठाणे येथे सकाळी 11 वाजता ठाणे जिल्ह्यातील ठाणे, कल्याण डोंबिवली, भिवंडी निजामपूर, उल्हासनगर, नवी मुंबई व मीरा भाईंदर या 6 महानगरपालिका तसेच कल्याण, शहापूर, भिवंडी, ठाणे, मुरबाड, अंबरनाथ व उल्हासनगर या 7 तालुक्यांतील क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षकांच्या महासंघाच्या कार्यकारिणीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या जिल्हा नियोजन बैठकीला राज्य अध्यक्ष शरदचंद्र धारुरकर, मुंबई विभागीय सचिव अंकुर आहेर व ठाणे जिल्हा अध्यक्ष प्रमोद वाघमोडे हे उपस्थित राहणार आहेत. बैठकीच्या आयोजनाची जबाबदारी ठाणे महानगरपालिका क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे अध्यक्ष रणजित शिंदे व सचिव एकनाथ पवळे व सर्व कार्यकारणी टीम यांनी क्रीडा समन्वयक मनपा ठाणे माननीय शंकरजी बरकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीकारली आहे. या बैठकीत महानगरपालिका व तालुका कार्यकारिणी घोषित करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग व क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांचेकडून क्रीडा व शारीरिक शिक्षण या विषयाचा अभ्यासक्रम, क्रीडा शिक्षक भरती, शालेय क्रीडा स्पर्धा या विषयांच्या अनुषंगाने शरदचंद्र धारुरकर हे मार्गदर्शन करणार आहेत असे जिल्हा अध्यक्ष प्रमोद वाघमोडे यांनी सांगितले. ठाणे जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका व तालुक्यातील कार्यकारिणी प्रतिनिधींनी एकजुटीने या बैठकीला उपस्थित रहावे असे आवाहन महासंघाचे विभागीय सचिव अंकुर आहेर व ठाणे जिल्हा अध्यक्ष प्रमोदजी वाघमोडे यांनी केले आहे.

# आदिवासी बांधवांनी श्रमदानातून साजरा केला गुढी पाडवा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : महाराष्ट्रात गुढी पाडव्यानिमित्त सर्वत्र गुढी उभारून, शोभायात्रा काढून विविध सांस्कृतिक कार्यक्रम होत असताना पेण तालुक्यातील ग्रुपग्राम पंचायत बोरगाव हद्दीतील उंबरमाळ आदिवासी वाडीतील ग्रामस्थ व ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या कार्यकर्त्यांनी मात्र आदिवासी वाडीच्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी श्रमदानातून नैसर्गिक झऱ्याचे खोलीकरण करून जलस्त्रोतांचे बळकटीकरण करीत गुढी पाडवा साजरा केला आहे.

सुमारे १२५ च्या आसपास लोकसंख्या असलेल्या पेण तालुक्यातील ग्रुप ग्राम पंचायत बोरगाव हद्दीतील उंबरमाळ आदिवासी वाडीत एकच विहीर असून त्यातील पाणीसाठा कमी झाल्याने येथील आदिवासी बांधवांना पाणी टंचाईचा सामना करावा लागतोय हे लक्षात घेऊन ग्राम संवर्धन संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी कार्यकर्त्यांसह वाडीतील सर्व ग्रामस्थांना एकत्रित करीत पाणी समस्येबाबत बैठक घेतली त्या बैठकीतून आदिवासी बांधवांनी वाडीच्या खालच्या बाजूला साधारण पाचशे मीटर अंतरावर असलेल्या एका लहानशा झऱ्याला भरपूर पाणी असल्याचे सुचविल्यानुसार रविवारी गुढी पाडव्याच्या दिवशी सर्व ग्रामस्थ व ग्राम संवर्धनच्या कार्यकर्त्यांनी श्रमदानातून या झऱ्याचे खोलीकरण करण्याचे ठरविले आणि आदिवासी बांधवांच्या या प्रयत्नाला यश आले असून भरपूर पाणी लागले असून त्या ठिकाणी विहीर बांधल्यास वाडीच्या पाण्याची समस्या कायमस्वरूपी सुटेल असा विश्वास स्थानिक आदिवासी ग्रामस्थ यशवंत वाघमारे यांनी व्यक्त केला आहे.

# भिवंडी तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी तालुकाध्यक्षपदी दिलशाद शेख



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा: राजकीय दृष्ट्या महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील दिलशाद शेख यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, यांच्या आदेशाने राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण ठाणे जिल्हा अध्यक्ष प्रतीक प्रमोद हिंदूराव यांच्या मार्गदर्शनाने भिवंडी तालुक्यातील पडघा येथील दिलशाद सिकंदर शेख यांचे राजकीय व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय काम व तळागाळात राष्ट्रवादी पक्ष वाढवण्यासाठीची तळमळ पाहता राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी ठाणे जिल्हा अध्यक्ष प्रतिक हिंदूराव यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन दिलशाद शेख यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी भिवंडी तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली. तसेच अंतर्गत गटबाजीला कंटाळून शेख यांनी शिवसेना (शिंदे गट) उपतालुकाप्रमुख पदाचा राजीनामा देऊन राष्ट्रवादी (अजितदादा पवार) काँग्रेस पार्टीत नुकताच प्रवेश केला होता त्या अनुषंगाने त्यांची नियुक्ती महत्वाची मानली जात आहे यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा अध्यक्ष भरतभाऊ गोंधळी, तालुका अध्यक्ष विजयदादा पाटील, प्रांतिक सदस्य, रवी परटोले, जिल्हा सरचिटणीस, प्रभाकर शेळके,बाबा ग्रुप फाउंडेशचे,अध्यक्ष अनिकेत जाधव उपस्थित होते.

# कल्याणमध्ये 'तो बहिर्जी होता' कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : 'तो बहिर्जी होता' हा कार्यक्रम कल्याण मध्ये क्रिसेंडो कल्लाकार तर्फे प्रथमच आयोजित केला जात आहे. रामनवमीच्या दिवशी म्हणजेच रविवार दिनांक 6 एप्रिल रोजी रात्री 8.45 वाजता कल्याणच्या अत्रे रंगमंदिर येथे हा सादर होणार आहे. कल्याणकारांसाठी काही नावीन्यपूर्ण कार्यक्रमाचं आयोजन क्रिसेंडो कल्लाकारतर्फे गेले दोन वर्ष केले जात आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे गुप्तहेर बहिर्जी नाईक यांच्या कारनाम्यांची इतिहासात फारशी नोंद नाही. अधिवक्ता आनंद देशपांडे यांनी बहिर्जींच्या कथा तर्कशास्त्रावर आधारित लिहिल्या आहेत. "तो बहिर्जी होता" हा रंगीत कार्यक्रम सुप्रसिद्ध दिग्दर्शक




दिग्पाल लांजेकर यांनी त्या कथांचे शक्तिशाली नाट्यमय कथन, अचूक ऐतिहासिक विश्लेषण आणि श्री शिवराज अष्टकातील गाण्यांचे सादरीकरण यांचे सुंदर संयोजन आहे असे मेघ दांडेकर यांनी सांगितले. नुकत्याच छावा या चित्रपटास मिळालेल्या अभूतपूर्व यशानंतर या कार्यक्रमास ही कल्याण मधील शिवप्रेमी नागरिक व तरुणाई उत्सुर्त प्रतिसाद देतील असे क्रिसिंडो कल्लाकार च्या ईशान भट यांनी सांगितले.

# आरोग्य
## ब्लॅक कॉफीची कमाल



ब्लॅक कॉफी आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. ब्लॅक कॉफीमध्ये अँटिऑक्सिडंट्स, क्लोरोजेनिक एसिड, पॉलीफेनॉल, कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम, व्हिटॅमिन्स B2, B3 आणि B4 आहेत. त्यात आढळणारे कॅफिन शरीरात डोपामाइन, सेरोटोनिन आणि नोराड्रीलीईनचं प्रमाण वाढवतं. ब्लॅक कॉफी प्यायल्याने ताण कमी होतो. यामध्ये कॅफिनचं प्रमाण जास्त असतं, जे शरीरात हॅपी हार्मोन वाढवतं, त्यामुळे थकवा, ताण आणि आळस दूर होतो. दररोज फक्त एक किंवा दोन कप कॉफी प्यायल्याने हृदयाचं आरोग्य सुधारतं. तसेच स्ट्रोक, हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो.

वजन कमी करण्यासाठी देखील फायदेशीर आहे. त्यात कॅलरीज कमी असतात, ज्यामुळे फॅट लवकर कमी होतात. जिमला जाण्यापूर्वी कॉफी प्यायल्याने एनर्जी मिळते. फॅटी लिव्हर, हेपेटायटीस आणि सिरोसिससारख्या लिव्हरशी संबंधित आजारांशी लढण्यास मदत होते. ब्लॅक कॉफी दररोज प्यायल्याने लिव्हरमध्ये आढळणाऱ्या हानिकारक एन्झाईम्सची लेव्हल कमी होते. जर तुम्ही गरजेपेक्षा जास्त ब्लॅक कॉफी प्यायलात तर त्याचा तुमच्या आरोग्याला त्रास होऊ शकतो. ब्लॅक कॉफीचं सेवन मर्यादेतच करावं. ब्लॅक कॉफीचं जास्त प्रमाणात सेवन केल्याने तुमच्या आरोग्यावर घातक दुष्परिणाम होऊ शकतात.

**नेमकी किती कॉफी प्यावी?** जर तुम्ही एका दिवसात ५०० मिलीग्रामपेक्षा जास्त कॅफीन घेत असाल, तर तुमची सवय ताबडतोब बदला. याशिवाय मानसिक आरोग्य, किडनी आणि थायरॉईडच्या रुग्णांनी ब्लॅक कॉफी पिण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला जरूर घ्यावा.

# शिक्षणशास्त्र महाविद्यालय शिवळे येथे 'महिला सक्षमीकरण' या विषयावर राष्ट्रीय परिषद संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : शुक्रवार, २८ मार्च २०२५ रोजी जनसेवा शिक्षण मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय (बी.एड. कॉलेज, संलग्न - मुंबई विद्यापीठ) शिवळे, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे येथे मुंबई विद्यापीठाच्या मार्गदर्शन व सहकार्याने 'महिला सक्षमीकरण भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य' या विषयावर एकदिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली. सदर राष्ट्रीय परिषद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आमदार सन्माननीय गोटीरामभाऊ पवार यांच्या अध्यक्षतेखाली आणि मुंबई विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. सुनीता मगरे यांच्या उपस्थितीत पार पडली. या राष्ट्रीय परिषदेत डॉ. मीना कुटे, डॉ.भाऊसाहेब




आंधळे यांनी बीजभाषण केले. यावेळी जनसेवा शिक्षण मंडळाचे सहसचिव मा.भास्कर हरड, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.ए.बडगुजर, प्रा. डॉ.शैलेश डोंगरे तसेच शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, अनेक संशोधक अभ्यासक आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

या राष्ट्रीय पातळीवरील परिषदेत अनेक संशोधकांनी आपली संशोधन पेपरचे सादरीकरण केले . यामध्ये संशोधक अभ्यासक प्रा.सुनील म्हसकर यांचा 'महिला शिक्षकांमधील महिला सक्षमीकरणाचा अभ्यास' या विषयावरील पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे सादर केलेला रिसर्च पेपर सर्वात उत्कृष्ट ठरल्याबाबत डॉ. सुनीता मगरे यांनी सुनील म्हसकर यांचे दोनदा विशेष कौतुक व अभिनंदन केले.

सदर राष्ट्रीय पातळीवरील परिषदेचा लाभ अनेक प्राध्यापक, शिक्षक, संशोधन अभ्यासक व बी.एड., डिएसएम विद्यार्थी यांनी घेतला. यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते राष्ट्रीय परिषदेतील सहभागीतांना व रिसर्च पेपर सादर करणाऱ्या संशोधकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते एकूण ४१ रिसर्च पेपर असलेल्या आंतरराष्ट्रीय मानक अनुक्रमांक (International Standard Serial Number- ISSN) प्राप्त मासिक रिसर्च जर्नल पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

राष्ट्रीय पातळीवरील परिषद यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के.सी.राठोड, परिषेचे संयोजक प्रा.अर्चना भालेवार, सह -संयोजक प्रा.बी.एच.विशे, प्रा. कि. के. खापरे आणि बीएडचे सर्व छात्र अध्यापक, डीएसएमचे विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. यावेळी बुक एडिटिंग - डॉ. राकेश रामराजे, फोटोशूट - सचिन गवाळे,भावेश केदार, आदेश घुटे, रजिस्ट्रेशन - अविनाश घनघाव, ज्ञानेश्वर थोरात, व्हिडिओ शूटिंग - शुभम पडवळ, तांत्रिक सहाय्यक - प्रांजल पवार आदींनी आपापली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.बी.एच.विशे यांनी केले. सदर राष्ट्रीय परिषदेचे अहवाल वाचन प्रा.अर्चना भालेवार यांनी उत्तम प्रकारे केले तर आभार प्रदर्शन प्रा. डि.के. खापरे यांनी केले. राष्ट्रगीतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# मुरबाड तालुक्याचा पाणी टंचाई कृती आराखडा तयार



## एक कोटी ९३ लाख रुपयाची तरतूद!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी पट्टयातील तसेच काही मुरबाड शहरातील भागात पाणीटंचाई निवारणार्थ उपयोजनाकरिता त्यांचे संभाव्य कृती आराखडा मंजूर करण्यात आला असून त्या आराखड्यात टंचाई उपयोजना घेण्यात आल्या असून जसे नवीन विंधन विहीर घेणे, पाणीपुरवठा योजना विशेष दुरुस्ती घेणे ,टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे याकरिता ३२ गावे ४४ पाडयांना जवळपास एक कोटी ९३ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे अशी माहिती मुरबाड पंचायत समिती पाणीपुरवठा विभाग उपाभियंता जगदीश बनकरी यांनी दिली आहे.



मुरबाड तालुक्यात जल जीवन मिशन अंतर्गत १८९ योजना मंजूर झाले असून त्यापैकी शंभर टक्के योजना पूर्ण ३९ असून,, त्यामध्ये ७५ ते ९९% ५५ योजना , ५० ते७४ टक्के ५७योजना, २५ ते ४९ टक्के २२ योजना, ० ते २४ टक्के १६ योजना असे काम सध्या प्रगतीत आहे. तसेच उरलेल्या जलमिशन योजना वेळेवर पूर्ण का होत नाहीत याची कारणे पुढील प्रमाणे,, गाव स्तरावर वन खात्याकडून जमीन हस्तांतरित होण्यास विलंब,, काही गाव स्तरावर खाजगी मालकीच्या जमिनीच्या अडचणी,, काही योजना ठेकेदारामुळे विलंब होत आहे तरी त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे, तसेच शासनाकडून निधी उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण होत असल्याने या कारणामुळे पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठी विलंब होत असल्याचे चित्र समोर आले आहे. सन २०२३ च्या पाणीटंचाई कालावधीत ५२ गाव पाड्यांना ८ टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला होता. सन२०२४ च्या पाणीटंचाई कालावधीत ३५ गावपाड्यांना सहा टँकरने पाणीपुरवठा करण्यात आला होता तर सन २०२५ च्या पाणीटंचाईमध्ये २७ गाव पाड्यांना ५ टँकरने पाणीपुरवठा करण्याबाबत कृती आराखड्यात मंजुरी घेण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. तसेच सध्या स्थितीत टँकरने पाणीपुरवठा मागणी प्रस्तावची पाहणी करून पाटगाव-वाघवाडी, फांगूळगवहाण -आंबेमाळी, तोंडली पाडा येथे टँकरनी टँकरने मागणी प्रस्ताव तहसील कार्यालयाकडे सादर करण्यात आले आहे. माहिती मुरबाड पंचायत समिती पाणीपुरवठा प्रशासनाने दिली आहे.

> **मुरबाड तालुक्यात जल जीवन मिशन अंतर्गत १८९ योजना मंजूर झाले असून त्यापैकी शंभर टक्के योजना पूर्ण ३९ असून,, तसेच ७५ ते ९९% ५५ योजना , ५० ते७४ टक्के ५७ योजना, २५ ते ४९ टक्के २२ योजना, ० ते २४ टक्के १६ योजना असे काम सध्या प्रगतीत आहे.**
>
> **- जगदीश बनकरी**
> **उप अभियंता,पंचायत समिती पाणीपुरवठा विभाग मुरबाड**

# मयत खातेदारांच्या वारस नोंदी करा
## कल्याण तहसीलदारांचे आवाहन


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महसूल विभागा अंतर्गत राज्य शासनाने १०० दिवसांचा कृती कार्यक्रम आराखडा राबविण्या बाबत निर्देश दिले होते. या अंतर्गत "जिवंत सातबारा मोहिम" राज्यात राबविण्यात यावी, असा शासन निर्णय दि.१९/०३/२०२५ रोजी घेण्यात आला. त्या अनुषंगाने ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी ठाणे जिल्हयातील सर्व मयत खातेदारांच्या वारसांची नोंद अधिकार अभिलेखात अद्यावत करण्यासाठी "जिवंत सातवारा मोहिम" प्रभाविपणे राबविण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार केला आहे.

"जिवंत सातबारा मोहिम" अंतर्गत सातबारावरील गावातील सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे. मयत खातेदार यांच्या वारसांना शेतजमिनीच्या अनुषंगाने विविध दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रामध्ये वारसांची नोंद विहित कालावधीत अधिकार अभिलेखामध्ये नोंद न झाल्याने अडचणींना सामोरे जावे लागते. या दृष्टीकानातुन संपूर्ण राज्यात "जिवंत सातबारा मोहिम" राबविण्यात येत आहे.

तरी शेतकरी यांना आव्हान करण्यात येते की, आपण आपल्या गावाचे ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे मयत खातेदारांच्या वारस नोंदीबाबत कार्यवाही करावी. सर्व वरसांची नावे, वय, पत्ते व भ्रमणध्वनी क्रमांक यांचा उल्लेख केलेला अर्ज संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे दि.०५ एप्रिल २०२५ पर्यंत दाखल करावा. त्यासोबतच मृत्यूदाखला, सत्यप्रतिज्ञापत्र, रहिवासी दाखला, पोलिस पाटील सरपंच ग्रामसेवक यांचा दाखला या कागदपत्रांची पुर्तता करावी असे आवाहन कल्याणचे तहसीलदार सचिन शेजाळ यांनी केले आहे.

# पडघा येथे बैलगाडीतून श्री स्वामी समर्थांची मिरवणूक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे सजवलेल्या बैलगाडीतून श्री स्वामी समर्थ यांची मिरवणुक काढण्यात आली होती.

श्री स्वामी समर्थ प्रगटदिनानिमीत्त बालाजी नगर येथील चंद्रशेखर शेरेकर यांच्या श्री स्वामी समर्थ मंदीरात सोमवारी प्रगट दिन विविध आध्यात्मिक कार्यक्रमाव्दारे उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी सायंकाळी टाळ मृदूंगाच्या गजरात श्रींचा पालखी सोहळा काढण्यात आला होता यावेळी ह. भ. प. रामदास वेंखडे यांच्या मार्गदर्शनाखाली चक्क सजविलेल्या बैलगाडीतून वेशभूषा केलेल्या स्वामी समर्थांच्या प्रतिकृतीची संपूर्ण पडघे गावातुन मिरवणूक काढण्यात आली होती. तर यावेळी आकर्षक वेशभूषा करून स्वामी समर्थांची भुमीका पार पाडणारे कैलास ठाकूर यांनी सर्वांचेच लक्ष वेधून घेतले होते. यावेळी नागरीकांनी, महीलांनी मनोभावे पालखीचे औक्षण करून दर्शन घेतले.

# शासन आदेशाप्रमाणे दिलेला शब्द पूर्ण करु - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## आ. ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी टप्पा वाढ अनुदानासाठी केलेल्या प्रयत्नांना यश



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शिक्षकांनी अनुदानासाठी आझाद मैदान, परभणी, जालना, हिंगोली या ठिकाणी आंदोलन करून आत्मदहनाचा प्रयत्न केला. सदर विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्याशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी टप्पा अनुदानाच्या विषयी चर्चा झाली आहे असे सांगितले. तसेच आपल्याला एका शिक्षकाला किती दरमहा खर्च येणार आहे याची माहिती घेतली व पुढच्या आठवड्यात हे सर्व कॅल्क्युलेशन पाहुण त्यानुसार आपण अनुदान निधी दोन ते तीन टप्प्यात उपलब्ध करून देऊ व शासन आदेशाप्रमाणे सर्वांना दिलेला शब्द पूर्ण करू असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना सांगितले.

दि.01 एप्रिल 25 रोजीच्या कॅबिनेटमध्ये टप्पा अनुदानाचा विषय यावा म्हणून शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली व आजच्या मीटिंगमध्ये विषय घ्यावा अशी विनंती केली. त्यानुसार दि.01 एप्रिल च्या कॅबिनेटमध्ये दि.14 ऑक्टोबर 24 च्या शासन आदेशाप्रमाणे अनुदान निधी उपलब्ध करून द्यावा लागेल याविषयी शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विषय काढला. व त्यासाठी 1500 कोटी रुपये लागतील असे सर्व मंत्रिमंडळाच्या बैठकीत सांगितले. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी त्यावर चर्चा केली व तात्काळ मार्ग काढा असे आदेश दिले. त्यामुळे शिक्षक वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून शिक्षकांनी आ. ज्ञानेश्वर म्हात्रे सरांचे आभार मानले.

## शिक्षकांचे अनुदानावर चर्चा व तात्काळ आदेश काढण्याच्या दिल्या सूचना

# यंदाचा याज्ञवल्क्य पुरस्कार माजी प्रकुलगुरू डॉ.नरेशचंद्र ,संपादक मिलिंद बल्लाळ यांना जाहीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : यंदाचा याज्ञवल्क्य पुरस्कार ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ मुंबई विद्यापीठाचे प्र कुलगुरू आणि बिर्ला महाविद्यालयाचे संचालक डॉ नरेश चंद्र आणि दैनिक ठाणे वैभव वृत्तपत्राचे ज्येष्ठ संपादक मिलिंद बल्लाळ यांना जाहीर झाला आहे. तर शिक्षणसेविका विद्या धारप यांना सुशिलाबाई एकलहरे पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. याज्ञवल्क्य संस्थेतर्फे नुकतीच यंदाच्या पुरस्कार देण्यात येणाऱ्या मान्यवर व्यक्तींची नावे पत्रकार परिषदेत जाहीर करण्यात आली आहेत. यावेळी पत्रकार परिषदेला याज्ञवल्क्यचे विश्वस्त मिलिंद कुलकर्णी, राजीव जोशी, राधाकृष्ण पाठक, कार्यवाह प्रसन्न कापसे उपस्थित होते.

येत्या शनिवारी ५ एप्रिल रोजी सायं ५ वाजता कल्याणातील आचार्य प्र. के.अत्रे रंगमंदिर येथे हा



पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते डॉ.प्रकाश आमटे, महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, महाराष्ट्र टाईम्सचे संपादक श्रीकांत बोजेवार आणि माजी आमदार नरेंद्र पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहितीही संस्थेतर्फे देण्यात आली.

कल्याणकर विविध क्षेत्रात प्रसिध्दीपासून दूर होऊन कार्यरत आहेत. आपल्या कार्यकर्तुत्वाने ते समाजात आगळे वेगळे स्थान निर्माण करीत असून कल्याणला भारतचार्य वैद्य, कवी माधवानुज, भारतातल्या पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी, कथाकार दि.बा.मोकाशी, अंबादास अग्निहोत्री, साहित्यिक वि.आ.बुवा, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिल्पकार भाऊ साठे, उत्कृष्ठ संसदपटू आणि अंदमान निकोबारचे माजी नायब राज्यपाल प्रा.राम कापसे, कृष्णराव धुळप अशा महान विभूतींची दैदिप्यमान परंपरा लाभली आहे. आधुनिक काळातही कल्याणच्या वैभवात भर टाकणाऱ्या कर्तुत्ववान कल्याणकरांच्या कार्याची दखल घेण्याच्या उद्देशाने १९९९ सालापासून याज्ञवल्क्य संस्थेकडून याज्ञवल्क्य पुरस्काराची संकल्पना राबविण्यात येत आहे.

तर सुशिलाबाई एकलहरे या कल्याणातील धडाडीच्या सामाजिक आणि राजकीय कार्यकर्त्या होत्या. त्यांच्या स्मरणार्थ सन २००७ पासून संस्थेचे कार्यकारी विश्वस्त डॉ.सुरेश एकलहरे यांनी विविध क्षेत्रात निरलस कार्य करणाऱ्या महिलांना सुशिलाबाई एकलहरे पुरस्कार सुरू केला आहे. आजतागायत १२ व्यक्तींना याज्ञवल्क्य पुरस्कार तसेच ७ महिलांना सुशिलाबाई एकलहरे पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे.

> **शिक्षणसेविका विद्या धारप यांना सुशिलाबाई एकलहरे पुरस्कार जाहीर**

# एकविरा देवीच्या कार्ला यात्रेनंतर पेण मधील यात्रांना सुरुवात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : गुढीपाडव्यापासून चैत्राला सुरुवात होत असतो. चैत्र महिना म्हटला की गावोगावच्या यात्रांचा माहोल सुरु होत असतो. त्याची तयारी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येते. यात्रांमधून प्रत्येक गावात धार्मिक वातावरण निर्माण होत असल्याने मोठ्या उत्साहात यात्रा साज-या केल्या जातात, कार्ला येथील एकाविरा देवीची यात्रा पार पाडल्यानंतर, पेण तालुक्यातील अनेक ठिकाणच्या देवीच्या यात्रांना सुरुवात होत असते.

एकविरा यात्रा शुक्रवार ४ एप्रिलला संपन्न होत असून भाविक मोठ्या प्रमाणावर एकविरा यात्रेसाठी जात असतात. यासाठी एसटी महामंडळाच्या वतीने जादा गाड्यांची व्यवस्था करण्यात आली असून दि. ३ ते ७ एप्रिल या कालावधी पर्यंत अलिबाग, कर्जत, पेण, रोहा, मुरुड या डेपोमधून जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत. तसेच स्थानकात गर्दीचा अंदाज बघून एसटी बसेस उपलब्ध करण्यात येणार आहेत.

या दरम्यान कार्ला यात्रेच्या वेळी प्रवाशांची कोणतीही गैरसोय होऊ नये याची दक्षता घेऊन तसेआदेश वरिष्ठ पातळीवरून देण्यात आले आहेत. कार्ला यात्रेनंतर पेण तालुक्यातील यांत्रांना सुरुवात होणार आहे यामध्ये वाशी, बोरी गडब, पांडापूर, कळवा, बळवली जोहा, मलेघर, उंबर्डे काळेश्री, कोलेटी जिते व अन्य ठिकाणच्या यात्रा संपन्न होणार असून ग्रामस्थ व कामिटीच्या वतीने यात्रांचे नियोजन करण्यात येत आहे.गावात शांतता रहावी यासाठी गावपंच कमिटीच्या माध्यमातून चोख व्यवस्था करण्यात येत असली तरी ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येत असतो. गावोगावी पालखी मिरवणूक व पाच ते सात दिवसांचे कार्यक्रम आयोजित करून भाविकांना श्रवण सुखाचा लाभ दिला जातो.

# ट्रकची विद्युत वाहिनीला धडक
## अपघात टळला



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगर शहरात सोमवारी सकाळी थरकाप उडवणारी घटना घडली. एका ट्रक चालकाच्या बेफिकीर आणि वेगाने भरधाव ट्रक चालवण्याच्या निष्काळजीपणामुळे उच्चदाबाच्या विद्युत वाहिनीला जोरदार धक्का बसला. हा ट्रक थेट विद्युत वाहिनीला अडकला आणि लोखंडी विद्युत खांब पूर्णपणे वाकला. या घटनेमुळे आजूबाजूच्या परिसरात काही क्षणांसाठी भीतीचं वातावरण निर्माण झालं.

घटना घडली त्या ठिकाणी इमारतीची दाट वस्ती असून, ही उच्चदाबाची वायर असल्यामुळे विजेचा जोरदार शॉक लागून मोठी जीवितहानी होण्याची शक्यता होती. मात्र, सुदैवाने महावितरणला याची वेळेवर माहिती मिळाली आणि त्यांनी अत्यंत तत्परतेने विद्युत पुरवठा खंडित केला. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच महावितरणचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले असून, विद्युत वाहिनीच्या दुरुस्तीचं काम युद्धपातळीवर सुरू होते. या घटनेनंतर निष्काळजी ट्रक चालकांवर कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# केंद्रीय रेल्वे बोर्डाचे सदस्य पदी धनराज गुट्टे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे :भारत सरकार रेल्वे मंत्रालय, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनीकुमार वैष्णव यांच्या आदेशानुसार सामान्य कुटुंबातील धनराज गुट्टे यांच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय कार्याची दखल घेऊन त्यांची तिसऱ्यांदा केंद्रीय रेल्वे बोर्ड सदस्य पदी निवड केली आहे.

या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत असून रेल्वेमंत्री व मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे, खासदार डॉ भागवतजी कराड, भाजपा महासचिव आमदार विक्रांतजी पाटील, माजी मंत्री संजयजी बनसोडे, आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, माजी मंत्री विनायकराव पाटील, शासनाचे प्रधान सचिव प्रविणजी दराडे, सागरजी डोईफोडे, अविनाशजी ढाकणे, अशोकराव मोराळे, संजयजी दराडे, पद्मश्री डॉ तात्याराव लहाने, सोमयजी मुंढे, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे, दिलीपराव ढोले, सुजाताताई ढोले, विजयकुमार लहाने, उपजिल्हाधिकारी



बाळासाहेब तिडके, लातूर भाजपा जिल्हा अध्यक्ष दिलीपराव देशमुख, माजी आमदार बब्रुवानजी खंदाडे, राहुलजी केंद्रे, गणेशजी हाके, भारतजी चामे, अशोकराव केंद्रे, त्रिंबकराव गुट्टे, किशोरजी मुंढे, गजानन आंधळे, शशिकांत दौंड, डॉ. अमोल गिते, संदिप चकोर, अर्जुन चेमटे आदी मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# ढगाळ वातावरणामुळे भाजीपाला पीके धोक्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : -मुरबाड तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी पट्ट्यात गेली चार ते पाच दिवसांपासून ढगाळ वातावरण असल्यामुळे शेतकऱ्यांनी केलेल्या भाजीपाला पीक धोक्यात आल्याचे प्रतिक्रिया भाजीपाला शेतकरी वर्गाने दिली आहे.

त्याच्यात मुरबाड तालुक्यात अतिशय कडक उन्हाळा जाणवत आहे त्यामुळे तालुक्यात ४० ते ४१ अंश सेल्सिअस पर्यंत तापमान जात आहे त्यामुळे पिकाच्या वेलीला लागणारी फळे अक्षरशः करपत आहेत. तालुक्यातील भाजीपाला करणारा शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे.



तसेच गेली चार दिवसापासून ढगाळ वातावरण असल्यामुळे काकडी, भेंडी ,ढोबली मिरची,या सारख्या भाजीपाला पिकावर मोठा परिणाम होत असल्याचे जाणवत आहे त्यामुळे शेतकरी वर्ग सध्या संकटात सापडण्याची चित्र दिसून येत आहे ढगाळ वातावरणाचा परिणाम तसेच उष्मा वाढल्याने भाजीपाल्याचे उत्पादन घटल्याची माहिती शेतकरी कोरावळे येथील धाऊ हुकममाळी यांनी दिली आहे.

> **शेतकरी वर्ग हवालदिल!**





# ललिता मोरे, सुरेखा गावंडे शिवशक्ती पुरस्काराने सन्मानित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : प्रजापिता ब्रह्मकुमारी आध्यात्मिक विश्वविद्यालय यांनी आयोजित केलेल्या 50 व्या आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त भारत आणि नेपाळ या देशातील कर्तुत्ववान महिलांचा गौरव सत्कार सोहळा माउंट आबू,राजस्थान येथे 29 मार्च रोजी ग्लोबल हॉलमध्ये संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी कल्याण मधील ब्रह्मकुमारीज रेणुकाबेन आणि अलका दीदी यांच्या माध्यमातून ज्येष्ठ कवयित्री, दिग्दर्शिका, लेखिका तसेच एमटीएनएल मधून सेवानिवृत्त झालेल्या सुरेखा गावंडे आणि राष्ट्रीय सौंदर्य स्पर्धेतील उपाधी विजेती तसेच गणेश विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका व जनशक्तीच्या वृत्त निवेदिका ललिता मोरे यांना येथे आमंत्रित करण्यात आले होते.यावेळी त्यांना शिवशक्ती नेतृत्व या पुरस्काराने गौरविण्यात आले. सत्कार समारंभात अनेक भेटवस्तू सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र इत्यादी प्रदान करण्यात आले. विविध कार्यक्रम आणि रोजच्या वेगवेगळ्या ऍक्टिव्हिटीज ज्यामधून सर्व महिलांना एकमेकांशी ओळखण्यासाठी जोडण्यासाठी मदत झाली. प्रत्येक महिला ही शिवशक्ती होती याची जाणीव येथे करून देण्यात आली. तसेच काही मोठ्या पदावरील दीदी यांनी दिलेले अध्यात्मिक ज्ञान यामुळे खूप शांती,आनंद,समाधान असे सर्व अनुभवण्यास मिळाले असल्याची प्रतिक्रिया ललिता मोरे यांनी दिली.

# नागरिकांनी उष्माघातापासून काळजी घ्यावी : जिल्हा परिषदेचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : सध्या राज्यामध्ये उष्णतेचे प्रमाण वाढले असून दिवसा काम करताना अनेक लोकांना अति उष्णतेमुळे त्रास होत असल्याचे दिसून येत आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये सुद्धा पारा हा नॉर्मल तापमानापेक्षा वाढला असून त्याचा त्रास लोकांना जाणवत असल्याचे दिसून येत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी लोकांना उष्माघातापासून काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी लोकांना उष्माघाताची लक्षणे ओळखावीत व आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. उन्हाळ्यामध्ये सतत पाणी पिणे आवश्यक असून कडक उन्हामध्ये गरज असल्यासच घरातून बाहेर पडावे असे आवाहन जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

उष्माघातापासून स्वत:चा बचाव कसा कराल?


- कडक उन्हात बाहेर जाणे टाळा.
- अनवाणी बाहेर जाऊ नका.
- लहान मुले किंवा पाळीव प्राणी यांना उन्हात पार्क केलेल्या गाडीत सोडू नका.
- दुपारच्या वेळेस बाहेर काम करण शक्यतो टाळा.
- स्वत:ला हायड्रेटेड ठेवा.
- सैल सूती कपडे घाला.
- चहा, कॉफी, दारू पिणे टाळा.
- कडक उन्हाच्या वेळी स्वयंपाक करणे टाळा.
- ओरल रिहायड्रेशन सोलूशन वापरा. लिंबू पाणी, ताक, लस्सी आणि फळांचे रस यासारखे घरगुती पेय प्यावे.
- डोके झाकून ठेवा- थेट सूर्यप्रकाशाच्या संपर्कात असताना छत्री, टोपी, टॉवेल, यासारख्या पारंपारिक साधनांचा वापर करावा.

जेष्ठ नागरिकांमध्ये उष्माघाताची लक्षणे

- दिशाहीनता, भ्रम, गोंधळ, चिडचिड, झटका येणे किंवा कोमात जाणे.
- गरम लाल, कोरडी त्वचा.
- मुख्य शरीराचे तापमान ४० डिग्री से. पेक्षा अधिक किंवा १०४ डिग्री एफ.
- स्नायू कमकुवत किंवा पेटके आल्यासारखे वाटणे.
- मळमळ किंवा उलटी होणे.
- हृदयाच्या ठोक्यांची गती वाढणे, श्वास लागणे.

मुलांमध्ये उष्माघाताची लक्षणे

- भूक न लागणे, अत्याधिक चिडचिड होणे.
- लघवी ला कमी होणे.
- डोळ्यासमोर अंधुकपणा जाणवणे.
- सुस्ती, मानसिक भ्रम सारखी परिस्थिती
- झटका येणे.
- कोणत्याही ठिकाणावरून रक्त वाहने.



संवेदनशील किंवा जास्त जोखीम असलेल्या लोकांसाठी लहान अर्भक, लहान मुले, गर्भवती महिला, घराबाहेर काम करणाऱ्या व्यक्ती, ज्यांना मानसिक आजार आहे आशा व्यक्ती, शारीरिक दृष्ट्या आजारी, विशेषतः उच्च रक्तदाब, हृदयरोग असणाऱ्या व्यक्तींची जास्त काळजी घेण गरजेच आहे.

उन्हाळयाच्या दिवसांत लक्षात ठेवायच्या महत्वाच्या गोष्टी

- एकटे राहणाऱ्या वयोरुद्ध व्यक्ती किंवा आजारी लोकांच्या आरोग्यावर लक्ष ठेवा.
- शरिराला थंडावा देण्यासाठी पंखे आणि ओल्या कपड्यांचा वापर करावा.
- घरातील वातावरण थंड असावे.

घराबाहेर आणि घरामध्ये अतिउष्णतेच्या संपर्कामुळे हिटस्ट्रेस निर्माण होवू शकतो. ज्यामुळे उष्माघाताशी संबंधित आजार निर्माण होवू शकतात. तरी उष्माघाताची लक्षणे जाणवल्यास नजिकच्या दवाखान्यात उपचारासाठी जाण्याचे आवाहन जिल्हा परिषद आरोग्य विभाग ठाणे च्या वतीने नागरिकांना करण्यात येत आहे.

## वाचक मनोगत

# एक तरी हायब्रीड मार्गिका हवी !

एमएसआरडीसी महामंडळाच्या अखत्यारीतील टोलनाक्यांवर फास्टॅगद्वारे पथकर न भरणाऱ्या वाहन चालकांकडून दुप्पट कर आकारला जाणार, त्यासाठी सर्व मार्गीका फास्टॅग मध्ये रूपांतरित करण्यात आल्याची बातमी वाचण्यात आली. खरंतर दुप्पट आकार स्वीकारणार हे नाही म्हटलं तरी अन्यायकारक आणि वाहन चालकांना त्रासदायक, एक प्रकारे भुर्दंडच आहे असं म्हटल्यास ते चुकीचे होईलच असे नाही ? एमएसआरडीसी ने याबाबत पुनर्विचार करून निदान एक तरी मार्गीका हायब्रीड पद्धतीची ठेवण्यात यावी जेणेकरून अन्य मार्गानेही वाहन चालकांना आपला पथकर भरता येईल.

- विश्वनाथ पंडित, ठाणे

# सर्पमित्रांनी दिले सापासह पिल्लांना जीवनदान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवली पूर्वेतील भोपर येथील श्री स्वामी समर्थ चाळीत राहणारे शैलेश ओंबळे यांना त्यांच्या घरा शेजारी साप आडळला. ओंबळे यांनी त्याची माहिती सेवा संस्थेचे सर्प मित्र पूर्वेश कोरी यांना दिली. सर्प मित्र पूर्वेश कोरी, सुभाष पांडियन आणि प्राणीमित्र केदार मराठे हे घटना स्थळी पोहोचले. प्रथम दर्शनी पाहता घरा शेजारी दिवड जातीचा बिन विषारी साप आणि त्याची अंडी दिसली. हा साप व त्याची अंडी सर्प मित्रांनी आपल्या ताब्यात घेतली. सापास सुरक्षित पणे त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडले व त्याची ताब्यात घेतलेल्या अंडी मधून कृत्रिमरित्या पिल्लांना जन्म द्यायचं ठरविलं.

सर्प मित्र पूर्वेश कोरी व सुभाष पांडियन ती अंडी एका प्लास्टिक बॉक्स मध्ये काहीप्रमाणात वाळू, विटांचे तुकडे, काही पालापाचोळा गोळा करून उबविण्यासाठी सुरक्षित रित्या ठेवून दिली. प्लास्टिक बॉक्स मध्ये ठेवलेल्या अंड्यांमधून सोमवारी 30 सापाची पिल्लं बाहेर आली. या घटनेची माहिती वन परिक्षेत्र प्रा. कल्याणचे वनाधिकारी राजू शिंदे यांना कळवली. वनाधिकार्याच्या सुचेने प्रमाणे अंडीची योग्य ती देखरेख करून पिल्ले बाहेर आल्यानंतर त्यांनाही सर्प मित्र पुर्वेश कोरी, सुभाष पांडियन व प्राणीमित्र केदार मराठे यांच्या उपस्थितीत नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

सेवा संस्थाचा जनजागृती व अथक परिश्रमा मुळे डोंबिवलीतील साप मारण्याचे प्रमाण खूप कमी झाले असल्याची माहिती सेवा संस्थेचे अध्यक्ष व सर्प मित्र सौरभ मुळये यांनी दिली.

## कल्याणातील मठामध्ये
# स्वामी समर्थ प्रकट दिन संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याणातील बिर्ला कॉंलेज रोड, फॉरेस्ट कॉंलनी स्वामी समर्थ मठ येथे सदगुरु श्री स्वामी समर्थ सेवा ट्रस्ट कल्याण पश्चिम यांच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही श्री स्वामी समर्थ प्रकट दिन उत्सव सोहळा सोमवारी संपन्न झाला.

श्री स्वामी समर्थ प्रकट दिन उत्सावा निमित्त मठामधील स्वामींच्या पादुकावर सकाळी अभिषेक करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. या उत्सवानिमित्त होमहवन, आरती महाप्रसाद, गुरुपादुकाष्टाक, मानसपुजा संपन्न झाली. हरिपाठ,समर्थ महिला भजनी मंडळ यांनी सादर केला. दुपारी ४ ते ७ पालखी सोहळा संपन्न झाला. रात्री ८वा. महाआरती तसेच ९:३०वा. संगीत भजन सदगुरु श्री स्वामी समर्थ प्रसादिक भजन मंडळ यांनी सादर केले.

ब्रम्हलीन गुरूवर्य नवनितानंद महाराज (मोडक महाराज) यांनी सुरु केलेली श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन उत्सव पंरपरेनुसार मठाधिपती परमानंद महाराज, अवधूतानंद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन उत्सवाचे यशस्वी आयोजन श्री स्वामी समर्थ ट्रस्ट, गुरूबंधू, गुरूभगनी व मठातील सेवेकरी यांनी केले. हजारो दत्त भक्त, स्वामी भक्त भाविकांनी या उत्सवानिमित्त दर्शन, व महाप्रसादाचा लाभ घेतला.

# केडीएमसीची शाळा भरते घरात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली मनपाची शाळा क्रं 54 मोहीली येथील जुनी शाळा पाडल्याने मनपाच्या 1ली ते 5वीच्या विद्यार्थ्यांना गेल्या दोन महिन्यांपासून खाजगी घरात एकत्रपणे शिक्षण घेण्याची वेळ आली आहे.

कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रातील मनपा शाळांना हायटेक लुक देत स्मार्ट शाळाकडे वाटचाल करण्यासाठी आयुक्त अमंलबजावणी करीत आहेत. परंतु शिक्षण विभागाचा डिसाळ आणि नियोजन शून्य कारभार आणि समन्वय अभावामुळे गेल्या दोन महिन्यापासून मनपा शाळा क्रं 54 मधील 1ली ते 5वी चे विद्यार्थी शाळे अभावी मोहीली गावातील खाजगी घरात एकत्र शालेय धडे शिकत असल्याने मनपा शिक्षण विभागाचे पुरते वाभाडे निघाले असल्याचे दिसत आहे.

मंगळवारी मोहीली गावातील महिला आपल्या गावातील जुनी मनपा शाळा क्रं 54 नवीन शाळा बांधण्यासाठी गेल्या दोन माहिन्यांपूर्वी तोडली असून दोन महिन्यांपासून गावातील खाजगी मालकीच्या घरात इयत्ता 1ली ते 5वी पर्यंतचे विद्यार्थी शालेय शिक्षण घेत आहेत. नवीन शाळा बांधण्याचे काम सुरु होत नसल्याने हवालदिल झाल्याने आपल्या पाल्याच्या शैक्षणिक भवितव्या बाबत जागृत असणाऱ्या गावातील महिलांनी या प्रश्नी कल्याण डोंबिवली मनपा मुख्यालयाकडे धाव घेतली परंतु त्यांना प्रवेशद्वाराजवळ रोखण्यात आले.

त्यांच्या सूदैवाने कल्याण डोंबिवली मनपा प्रशासान शिक्षण अधिकारी रमेश चव्हाण, शिक्षण अधिकारी विजय सरकटे यांची प्रवेशद्वारा नजीक प्रसिद्धी माध्यमासमोर भेट झाली. मोहिली गावातून आलेल्या महिलांनी पाल्यांच्या शैक्षणिक भवितव्या बाबत जुनी शाळा पाडून दोन महिने झाले असून नवीन शाळा बांधण्याचे काम अद्याप देखील सुरू झाले नाही. त्यामुळे खाजगी मालकीच्या घरात शाळा किती दिवस मुलांना एकत्र शिकवणार असा जाब विचारला आणि नवीन शाळा बांधण्याचे काम सुरू होत नाही, शाळा बंद होणार आहे? का असा प्रतिसवाल केला.

या प्रश्नाच्या सरबत्ती मुळे प्रशासन अधिकारी यांनी शाळा बांधण्याचे काम सुरू असून लवकरच ते पूर्ण होईल असे सांगितले. परंतु उपस्थितीत महिलांनी नवीन शाळा बांधण्याचे काम प्रलंबित असल्याचे ठणकावून सांगितले असता त्यांना अश्वासन दिले की येत्या सुट्ट्यांच्या महिन्यात शाळेचे काम पूर्ण होईल असे मोघम उत्तर देत बोळवणी केल्याचे दिसले. तर महिलांनी जर शाळा दोन महिन्यात बांधली गेली नाही तर आपल्या पाल्यांना दुसऱ्या खाजगी शाळेत कसा प्रवेश मिळविण्याचा यक्ष प्रश्न उभा ठाकला असल्याचे प्रसिद्धी माध्यांना सांगितले.

नवीन शाळा बांधण्यापूर्वी आणि जुनी शाळा तोडण्यापूर्वी जागेच्या प्रश्ना बाबत शिक्षण विभागात मालमत्ता विभागात समन्वय नसल्याचे दिसून येत आहे. दोन महिन्यांपूर्वी जुनी शाळा तोडली आणि तात्पुरत्या स्वरूपात खाजगी मालकीच्या घरात दोन महिन्यांपासून 1ली ते 5वीचे विद्यार्थी कोंडवाड्यासारखे एकत्र शिक्षण घेत असतील तर दुर्दैव म्हणावे लागेल.

शाळेची पटसंख्या वाढण्याबाबत शिक्षकाने जुन्या शाळेत वर्ग खोल्यांमध्ये शैक्षणिक तक्ते आदि सुविधा करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक धडे देत पट संख्या वाढविण्यासाठी मेहनत केल्याने ही पटसंख्या टिकून होती. आता तरी शिक्षण विभागाने या संदर्भात गंभीरपणे विचार करून नवीन शाळेचा बांधकाम प्रश्न मार्गी लावून ग्रामीण परिसरातील या मोहीली शाळेला नावारूपाला आणले पाहिजे अशी मागणी यानिमित्ताने जोर धरू पाहत आहे.

# सुनील म्हसकर यांच्या रिसर्च पेपरचे राष्ट्रीय चर्चासत्रात सादरीकरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : शुक्रवार, २८ मार्च २०२५ रोजी जनसेवा शिक्षण मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय (बी.एड. कॉलेज, संलग्न - मुंबई विद्यापीठ) शिवळे, तालुका मुरबाड, जिल्हा ठाणे येथे 'महिला सक्षमीकरण भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य' या विषयावर एकदिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय परिषद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आमदार सन्माननीय गोटीरामभाऊ पवार यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रमुख अतिथी मुंबई विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागाच्या प्रा.डॉ. सुनीता मगरे, जनसेवा शिक्षण मंडळाचे सहसचिव भास्कर हरड, तज्ञ मार्गदर्शक व परीक्षक डॉ.मीना कुटे, डॉ.भाऊसाहेब आंधळे, आदी मान्यवर आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.ए.बडगुजर, प्राचार्य डॉ.के.सी.राठोड, प्रा. अर्चना भालेवार, प्रा.बी.एच.विशे




प्रा.डॉ.शैलेश डोंगरे, संशोधन अभ्यासक, आणि बीएडचे सर्व शिक्षक व विद्यार्थी आदी उपस्थित होते.

या राष्ट्रीय पातळीवरील परिषदेत अनेक संशोधकांनी आपली संशोधने सादर केली. यामध्ये संशोधन अभ्यासक सुनील म्हसकर यांचा 'महिला शिक्षकांमधील महिला सक्षमीकरणाचा अभ्यास' या विषयावरील पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे सादर केलेला रिसर्च पेपर सर्वात उत्कृष्ट ठरल्याबाबत डॉ. सुनीता मगरे यांनी सुनील म्हसकर यांचे विशेष कौतुक व अभिनंदन केले. तसेच मान्यवरांच्या शुभहस्ते सुनील म्हसकर यांचा प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला.

या रिसर्च पेपरसाठी सुनील म्हसकर यांना मार्गदर्शक प्रा. डॉ.हिना वाधवानी आणि डॉ.भक्ती सिंघानिया (सहयोगी प्राध्यापक, सेवा सदन शिक्षण शास्त्र महाविद्यालय, उल्हासनगर) यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

संशोधन अभ्यासक सुनील म्हसकर हे सध्या मुंबई विद्यापीठातून 'शिक्षणशास्त्र' या विषयात पीएचडी करत आहेत. तसेच ते शेतकरी उन्नती मंडळाच्या सिताराम रामा पाटील विद्यालय आणि रामदास दुंदा केणे कनिष्ठ महाविद्यालय आमणे, तालुका भिवंडी येथे सहाय्यक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

सुनील म्हसकर यांनी या आधी आंतरराष्ट्रीय पातळीवर व राष्ट्रीय पातळीवर रिसर्च पेपर उत्तम प्रकारे सादर केले आहेत. तसेच त्यांनी आजतागायत आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील अनेक चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा, व वेबिनार यामध्ये सक्रीय सहभाग घेतला आहे.

संशोधन अभ्यासक सुनील म्हसकर यांनी संशोधन कार्यातील केलेल्या या कौतुकास्पद व अभिमानास्पद कामगिरीबाबत त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

# पडघा येथील प्रसिद्ध बोहाडा यात्रा उत्साहात संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील प्रसिद्ध बोहाडा यात्रा उत्साहात संपन्न झाली गुढीपाडव्याला भरणारी बोहाडा यात्रा म्हणजे पडघा येथील ग्रामदैवत असलेल्या गावदेवीचा उत्सव गुढीपाडव्याच्या पुर्वसंध्येला गावदेवी मंदीरात देवीचा जागर कार्यक्रम घेण्यात येतो नंतर दुसऱ्या दिवशी ग्रामस्थ मंडळाच्या वतीने बोहाडा यात्रा भरवली जाते ही बोहाडा यात्रा पंचक्रोशीत शेकडो वर्षांपासून प्रसिद्ध असुन या दिवशी सायंकाळी ६ ते पहाटेपर्यंत देवी देवतांची मुखवटे व आकर्षक वेशभूषा करून वाद्यवृंदाच्या



तालावर रात्रभर सोंगे नाचवली जात असल्याने ही सोंगे बघण्यासाठी व विविध लागलेल्या खाद्यपदार्थ, जिवनावश्यक वस्तु, गॉगल्स, कपडे, फुलदाणी, खेळणी, सौंदर्य प्रसादने खरेदी करण्यासाठी व यात्रेत दाखल झालेल्या विविध मनोरंजनाच्या, आकाशी पाळणे आदी साधनाचा उपभोग घेण्यासाठी नागरीकांनी तुंडुब गर्दी केली होती यावेळी पडघा ग्रामपंचायत ते डॉक्टर भांगरे यांच्या घरापर्यंत मुख्य रस्ता गर्दीने फुलून गेला होता. या बोहाडा यात्रेची सांगता दुसऱ्या दिवशी वेशभूषा केलेल्या गावदेवीचे सोंग गावभर वाद्यवृंदाच्या तालावर नाचवुन करण्यात आली यावेळी महीलांनी गावदेवीची मनोभावे ओटी भरुन आरती करून दर्शन घेतले.तसेच बोहाडा यात्रेत सहभागी झालेल्या विविध मान्यवंराचा ग्रामपंचायत पडघा यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. तर बोहाडा यात्रा यशस्वी करण्यासाठी पडघा येथील सर्व तरुणांनी विशेष मेहनत घेतली.



## बालरंगभूमी परिषद कल्याण शाखेच्या वतीने
# विनामूल्य आरोग्य शिबीर संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : बालरंगभूमी परिषद कल्याण शाखा आयोजित राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी जिल्हाध्यक्ष कला, सांस्कृतिक सेल व डॉक्टर्स सेल यांच्या सहकार्याने बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती अध्यक्षा ॲड. निलम शिर्के-सामंत यांच्या संकल्पनेतून बालरंगभूमी परिषद कल्याण शाखेच्या सर्व सभासदांचे विनामूल्य आरोग्य तपासणी शिबिर सोमवारी कल्याण पश्चिमेतील अभिनव विद्या मंदिर, पारनाका येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ईसिजी, शुगर, रक्तदाब, वजन, औषधे आदी सुविधा देण्यात आल्या.

या वेळी डॉक्टर्स सेल अध्यक्ष



डॉ.विनय पाटील तसेच डॉ. मंजू पाटील, डॉ.संकेत मनेरीकर व त्यांचे सहकारी परिचारिका प्रीति भानुशाली, अक्षता मोरे तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद कल्याण शाखा अध्यक्ष रविंद्र सावंत, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सांस्कृतिक सेल अध्यक्ष हेमंत यादगीरे, जेष्ठ रंगकर्मी अरविंद सरफरे, बालरंगभूमी परिषद कल्याण शाखेच्या अध्यक्षा सुजाता कांबळे-डांगे, उपाध्यक्ष संजय गावडे, प्रमुख कार्यवाह शिवाजी शिंदे, कोषाध्यक्ष दिपक चिपळूणकर, सहकार्यवाह विशाल पितळे व मेघा शृंगारपुरे, कार्यकारिणी सदस्य सौरभ आरोटे, सल्लागार प्रीति बोरकर, सई मेहेर, भूषण मेहेर या मान्यवरांच्या उपस्थितीत मोफत आरोग्य शिबिराचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.

यावेळी देवमाणूस सिरियल फेम नाट्य- सिने अभिनेते किरण डांगे यांची विशेष उपस्थिती लाभली. या आरोग्य शिबिराला जवळपास ३५ सभासदांनी उपस्थित राहुन सदर सेवेचा लाभ घेत व खेळीमेळीच्या वातावरणात शिबिर अत्यंत उत्साहात पार पाडले.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024